आर बी आय/२००४-०५/४९०

डि.बी.ओडी.क्र.एलईजी.बीसी.९५/०९.०७.००५/२००४-०५

जून ९, २००५

प्रति,

सर्व अनुसूचित वाणिज्य बँकांचे अध्यक्ष/कार्यकारी अधिकारी.
(आर आर बी सोडून)

प्रिय महोदय,

**मृत ठेवीदारांच्या खात्यांशी संबंधित दाव्यांची हिशेबपूर्ति - कार्यरीतींचे सुलभीकरण**

नोव्हेंबर ३, २००३ रोजी, आरबी आयच्या वार्षिक धोरणाच्या मध्यावधी घोषणेला अनुसरुन, सामान्य माणसाला मिळणा-या सार्वजनिक सेवांची गुणवत्ता सुधारण्याच्या उद्देशाने, आरबी आयने दि कमिटी ऑन प्रोसिजर अँड परफॉर्मन्स ऑडिट ऑन पब्लिक सर्व्हिसेस (सीपीपीएपीएस) शी सल्लामसलत केली. या समितीचा बॅकव्यवहार कार्यरीतींवरील अहवाल क्र. ३ व्यक्तींसाठी (अ-व्यापारी) ठेवीखाती आणि इतर सुविधा वरुन असे दिसून येते की, विशेषतः मृत ठेवीदारांच्या कुटुंबाला लागु असणाऱ्या त्रासदायक कार्यरीतींमुळे,अशा कुटुंबातील व्यक्तींना अतोनात त्रास होतो. आमची परिपत्रके क्र. डि.बी.ओडी.बीसी.१४८/०९.०७.००७/९९-२००० दिनांक डिसेंबर ६, २००० अन्वये, मृत खातेदारांच्या दाव्यासंबंधीच्या शिफारशींनुसार सध्याच्या कार्यरीतींचे अवलोकन केल्यावर, या विषयावरील पूर्वीचे सर्व निदेश रद्दबातल ठरविले जाऊन, मृत ठेवीदारांच्या दाव्यांची विनात्रास हिशेबपूर्ती व्हावी म्हणून पुढील निदेश दिले जात आहेत.

**<u>२)ठेवी खात्यांमधील शिल्लक मिळविणे.</u>**

**अ) जीवित/नामनिर्देशित कलम असलेली खाती**

२.१. आपणास माहितच आहे की, ठेवीदाराने नामनिर्देशित सुविधेचा उपयोग करुन वैध असे नामनिर्देशित केले असेल किंवा जीवित खाते उघडताना जीवित व्यक्ती कलम (“दोन्हींपैकी एक किंवा जीवित” किंवा “कोणीही एक किंवा जीवित” किंवा “पहिला किंवा जीवित” किंवा “दुसरा किंवा जीवित”) वापरले असेल तरः-

त्या ठेवी खात्यातील शिल्लक रक्कमेचे प्रदान मृत ठेवीदाराच्या जीवित व्यक्ती किंवा नामनिर्देशिताला करण्यात बँकेने आपले दायित्व/कर्तव्य पूर्ण केले आहे असे समजले जावे, मात्र :-

अ. योग्य अशा कागदपत्रांवरुन बँकेने ठेवीदार दिवंगत झाल्याची शहानिशा आणि जीवित व्यक्तीची/व्यक्तींची नामनिर्देशिताची ओळख पटवून घेतली असली पाहिजे.

ब. सक्षम अशा न्यायालयाकडून मृत खातेदाराच्या खात्यातून प्रदान करण्यास प्रतिबंध करणारा आदेश नसला पाहिजे, आणि

क. त्या जीवित व्यक्तीला (व्यक्तींना)/ नामनिर्देशिताला प्रदान करताना बँकेने स्पष्ट शब्दात, त्या मृत ठेवीदाराच्या कायदेशीर वारसांचे ते केवळ विश्वस्त आहेत असे सांगितले पाहिजे,

म्हणजे त्यांना केलेल्या प्रदानामुळे, एखाद्या व्यक्तीच्या प्रदान केलेल्या व्यक्ती/नामनिर्देशिताविरुध्द हक्क किंवा दाव्यावर काहीच परिणाम होणार नाही,

२.२ येथे हे नमूद केले पाहिजे की, वरील अटींनूसार जीवित व्यक्ती/नामनिर्देशिताला प्रदान केल्यावर बँकेचे दायित्व संपते.त्यामुळे कायदेशीर प्रतिनिधित्व हे गरजेपेक्षा जास्त असून त्यामुळे जीवित व्यक्ती/नामनिर्देशिताला टाळता येण्यासारखी असुविधा होऊन गंभीर स्वरुपाची पर्यवेक्षकीय नाराजी/नामुजुरीही निर्माण होईल. म्हणून अशा बाबतीत, मृत ठेवीदाराच्या जीवित व्यक्तीला (व्यक्तींना)/ नामनिर्देशिताला प्रदान करताना, बँकांनी वारसा प्रमाणपत्र वहिवाटीचे पत्र किंवा प्रोबेट इत्यादी किंवा कोणत्याही प्रकारचे नुकसानभरपाई करार किंवा हमीपत्र सादर करण्याचा आग्रह मृत खातेदाराच्या नावे कितीही रक्कम जमा असली तरी, जीवित व्यक्ती/नामनिर्देशिताकडून धरु नये.

**<u>ब. जीवित व्यक्ती/नामनिर्देशित कलम नसलेली व्यक्ती</u>**

२.३ मृत ठेवीदाराने कोणतेही नामनिर्देशिन केलेले नसल्यास किंवा कोणी एक किंवा जीवित (एक किंवा संयुक्तरीतीने चालविलेले खाते) सोडून इतर खात्यांच्या बाबतीत, बँकांना कळविण्यात येत आहे की, त्यांनी सामान्य माणसाला विनाकारण होणारा त्रास टाळण्याची गरज लक्षात घेऊन, ठेवीदाराच्या कायदेशीर वारसाला (वारसांना) प्रदान करण्यासाठी सुलभीकृत कार्यरीत वापरावी, या संदर्भात बँकांनी त्यांची जोखीम व्यवस्थापनप्रणाली लक्षात ठेऊन, मृत ठेवीदाराच्या खात्यातील रक्कमेमधून एक किमान सीमा-रक्कम ठरवावी आणि त्या रक्कमेपर्यंतचे, मृत ठेवीदाराच्या हक्क/दाव्यांचे तडतोडींचे प्रदान, फक्त नुकसान भरपाई पत्राशिवाय इतर कोणतीही कागदपत्रे न मागता करावे.

**३ <u>मुदत ठेवी खात्यांची मुदतपूर्व समाप्ती</u>**

मुदत ठेवींच्या बाबतीत, बँकांनी त्यांच्या असे खाते उघडण्याच्या फॉर्ममध्येच, ठेवीदार मुदत समाप्तीपूर्वीच मृत झाल्यास, मुदत ठेवींची मुदतपूर्व समाप्ती करण्याची परवानगी देता येईल असे कलम घालावे. अशा मुदतपूर्व निकासीच्या परवानगीसाठी असलेल्या अटीदेखील फॉर्मवर नमुद कराव्यात. अशा मुदतपूर्व निकासीसाठी कोणताही दंडात्मक आकार लागु होणार नाही.

**४ <u>मृत ठेवीदाराच्या खात्यात येणाऱ्या रकमांबाबत</u>**

अशा ठेवखात्याच्या जीवित व्यक्ती/नामनिर्देशिताला होणारा त्रास टाळण्यासाठी, मृत खातेदाराच्या जीवित व्यक्ती (व्यक्तींकडून) नामनिर्देशिताकडून बँकेने, मृत खातेदाराच्या नावे त्याच्या खात्यात येणा-या रकमांबाबत, करार/ अधिकारपत्र लिहवून घ्यावे. या बाबत बँका पुढील दोनपैकी एक पर्याय निवडू शकतातः-

मृत खातेदाराच्या जीवित व्यक्तीने (व्यक्तींनी)/ नामनिर्देशिताने, बँकेला अधिकारपत्र देऊन, दिवंगत श्री ----------------- यांची मालमत्ता या नावाने खाते उघडून त्यात अशा, मृत खातेदाराच्या नावे येणा-या रक्कमा जमा कराव्यात, मात्र त्यातून रक्कमा काढल्या जाऊ नयेत, किंवा

जीवित व्यक्तीने (व्यक्तींनी)/नामनिर्देशिताने बँकेला अधिकारपत्र देऊन अशा रक्कमा, त्या पाठविणाऱ्यांकडे खातेदार मृत असा शेरा मारुन परत कराव्यात, व त्यानुसार जीवित व्यक्तीला (व्यक्तींना) नामनिर्देशिताला कळवावे. त्यानंतर जीवित व्यक्ती/
नामनिर्देशित/कायदेशीर वारस, वित्तप्रेषण करणाराकडे जाऊन पराक्रम्य संलेखाद्वारें (निगोशिएबल इंस्टुमेट) किंवा ईसीएस द्वारा योग्य त्या लाभार्थीला त्या रक्कमांचे प्रदान करु शकतील.

**५ <u>सेफ डिपॉझिट लॉकर्सच्या उपयोगाबाबत</u>**

लॉकर भाडयाने घेणारा /सुरक्षित ठेव वस्तूंचा ठेवीदार मृत झाल्यावर त्याच्या नामनिर्देशितांनी (तसे नामनिर्देशन असल्यास) किंवा जीवित व्यक्ती/व्यक्तींनी (जेथे जीवित व्यक्तीबद्दलचे,

लॉकर/सुरक्षित वस्तु आलमारीच्या बाबतचे कलम असेल तेथे त्या लॉकर/सुरक्षा वस्तु अलमारीमधील वस्तूंच्या ताब्यासाठी, मूळ लॉकर भाडयाने घेणारा/ठेवीदार मृत झाल्यास विनंती केल्यास, बँकांनी, ठेवीखात्याबाबत असलेल्या वरील कार्यरीतीत योग्य ते बदल करुन ती अनुसरावी.या मार्गदर्शक तत्वांबाबत सविस्तर माहिती वेगळी पाठविण्यात येत आहे

६ **<u>दाव्यांच्या/हक्कांच्या तडजोडीसाठी कालमर्यादा</u>**

बँकांना कळविण्यात येत की, मृत ठेवीदारांच्या बाबतीत, त्याच्या जीवित व्यक्तीने (व्यक्तींनी)/ नामनिर्देशिताने (तांनी) हक्क दाखल केल्याच्या तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत असे हक्क/ दावे निकालात काढावेत, मात्र ठेवीदाराचा मृत्यू व दावेदारांचे हक्क यासंबंधीचे, बँकेचे समाधान होईल असे पूरावे हक्कदारांकडून सादर केले गेले असले पाहिजेत. बँकांनी, त्यांच्या संचालक मंडळाच्या ग्राहक सेवा समितीकडे/सुयोग्य अशा नियतकालिक रितीने, मृत ठेवीदार/लॉकरचे भाडेकरु/सुरक्षा
ठेव वस्तूंचे ठेवीदार यांच्याबाबतीत निकाली काढलेल्या व नियत कालावधीबाहेर प्रलंबित असलेल्या दाव्यांचा (त्याबद्दलच्या कारणांसह) अहवाल सतत पाठवित रहावे.

७ **<u>बँकव्यवहार विनियम अधिनियम, १९४९ मधील तरतुदी</u>**

या संदर्भात आपले लक्ष, बँकव्यवहार विनियम अधिनियम, १९४९ च्या कलम ४५ झेड ए ते कलम ४५ झेड एफ कडे आणि बॅकिंग कंपन्या (नामनिर्देशन) नियम १९८५ कडे वेधत आहोत.

८ **<u>सुधारित कार्यान्वन प्रणाली/कार्यरीती:</u>**

या परिपत्रकात नमुद केलेल्या निदेशांना अनुसरुन, निरनिराळया परिस्थितीत मृत झालेल्या खातेदारांच्या हक्कांबाबतच्या दाव्यांची तडजोड करण्यासाठी, बॅकांनी अनुसरावी अशी एक नमुनेदार कार्यरीत (एम ओपी), तयार करण्यास भारतीय बँक संघाला (आय बीए) सांगण्यात आले होते, म्हणून सर्व वैधायिक व लागू असणा-या तरतुदी आणि आय बीए तयार करणार असलेल्या एम पी ए, तसेच सध्या अस्तिवात असलेल्या कार्यरीतींचे पुनरावलोकन करुन,बँकांनी, त्यांच्या मृत ठेवीदारांच्या/लॉकर्स भाडयाने घेणाऱ्या/सुरक्षा ठेवीसाठी जिन्नस ठेवणाऱ्या हक्कासंबंधीचे दावे निकालात काढण्यासाठी, बँकांच्या संचालक मंडळाने संमत केलेली सुधारित धोरणे/कार्यरीती विकसित कराव्यात, असे त्यांना कळविण्यात येत आहे.

९ **<u>ग्राहक मार्गदर्शन आणि प्रसिध्दी</u>**

अशा नामनिर्देशन सुविधेच्या आणि जीवित व्यक्ती कलमाच्या फायद्यांबद्दलची जाणीव, बँकांनी त्यांच्या ग्राहकांना करुन द्यावी व याबाबत भरपूर प्रसिध्दीही करावी. प्रसिध्दी मजकुरातहेही ठळकपणे सांगण्यात यावे की, अशा वेळी मृत खातेदाराचा ठेवीचा/शिल्लकेचा ताबा, जीवित व्यक्ती कलम असल्याशिवाय, संयूक्त ठेवीखात्याच्या जीवित व्यक्तीला आपोआप मिळू शकत नाही.

१०. हे निदेश, मृत ठेवीदारांच्या जीवित व्यक्तीला (व्यक्तींना)/ नामनिर्देशिताला (तांना) दिल्या जाणा-या ग्राहक सेवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी अत्यंत महत्वाच्या समजल्या जाव्यात.

११. कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासू
(आनंद सिन्हा)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक